## L. A. BILL No. VI OF 2023.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA POLICE ACT.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६.**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५१ चा २२.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र पोलीस अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

(शा.म.मु.) एचबी २८३०—१ (२४६-३-२०२३)

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २ ची सुधारणा.

१९५१ चा २२.

**२.** महाराष्ट्र पोलीस अधिनियम (यात यापुढे, ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (६) मध्ये,—

(क) " " आयुक्त " " या मजकुरानंतर, " " विशेष आयुक्त " " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो, दिनांक ४ जानेवारी २०२३ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) " पोलीस आयुक्त " या मजकुरानंतर, " विशेष पोलीस आयुक्त " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो, दिनांक ४ जानेवारी २०२३ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील, खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल आणि तो, दिनांक ४ जानेवारी २०२३ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :—

" (अ-१) राज्य शासनास, बृहन्मुंबईकरिता विशेष पोलीस आयुक्त नेमता येईल.".

सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २५ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २५ मधील, पोट-कलम (२) मधील, खंड (अ) मध्ये, " अपर आयुक्त " या मजकुरानंतर ", विशेष आयुक्त " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो, दिनांक ४ जानेवारी २०२३ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

**५.** उद्देशिकेसह संपूर्ण मुख्य अधिनियमामध्ये, इंग्रजीमधील " ग्रेटर बॉम्बे " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल त्या त्या ठिकाणी त्याऐवजी " बृहन्मुंबई " हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

व्यावृत्ती.

**६.** विशेष पोलीस आयुक्ताने, मुख्य अधिनियमाखालील त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी, राज्य शासनाने कोणत्याही आदेशान्वये त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना केलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही ही, महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अधिनियम, २०२३ याद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींन्वये केलेली कृती किंवा यथास्थिति, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

२०२३ चा महा. .

**उद्देश व कारणे यांचे निवेदन.**

महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या (१९५१ चा २२) कलम ७ मध्ये बृहन्मुंबईकरिता किंवा इतर कोणत्याही क्षेत्रांकरिता पोलीस आयुक्त नेमता येईल आणि अशा क्षेत्रांपैकी कोणत्याही क्षेत्रांकरिता अपर पोलीस आयुक्त आणि पोलीस सह आयुक्त नेमता येतील अशी तरतूद आहे.

२. कल्याणकारी राज्याच्या आणि परिणामी पोलीस दलाच्या कर्तव्यांची व कार्यांची संकल्पना निश्चितपणे बदलत असताना व व्यापक होत असताना, शासनास तसेच पोलीस दलास अधिनियमाखालील त्यांच्या अधिकारांचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी व त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्यांनी समर्थ व्हावे म्हणून, महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या विद्यमान तरतुदींमध्ये विवक्षित बदल करणे आवश्यक आहे. म्हणून, बृहन्मुंबईकरिता राज्य शासनाने, शासन निर्णय, गृह विभाग, क्र. भापोसे - २०२२/प्र. क्र. ४३७/पोल -१, दिनांक ४ जानेवारी २०२३ द्वारे अपर पोलीस महासंचालक श्रेणीतील एक पद विशेष पोलीस आयुक्त म्हणून पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्यात आले आहे. त्या प्रयोजनाकरिता, अधिनियमामध्ये उक्त पदाच्या संदर्भाचा समावेश करण्यासाठी वैधानिक तरतुदी करण्याकरिता महाराष्ट्र पोलीस अधिनियमात सुधारणा करणे शासनास इष्ट वाटते.

३. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ द्वारे दिनांक ४ सप्टेंबर १९९६ पासून " ग्रेटर बॉम्बे" या नावात " बृहन्मुंबई " असा बदल केला असल्यामुळे, उक्त अधिनियमामध्ये सर्वत्र " ग्रेटर बॉम्बे " या संज्ञेऐवजी, " बृहन्मुंबई " ही संज्ञा दाखल करण्यात येत आहे. म्हणून, महाराष्ट्र पोलीस अधिनियमामध्ये यथोचित सुधारणा करणे, शासनास इष्ट वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २८ फेब्रुवारी २०२३.

**देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.

## सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक ६ — महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.

## (महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ यातील उतारे)

## (सन १९५१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२)

**१.** ** ** ** ** व्याख्या.

**२.** विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर, या अधिनियमात,—

(१) ते (५अ) ** ** ** **

(६) "महासंचालक व महानिरीक्षक", "अपर महासंचालक व महानिरीक्षक", "विशेष महानिरीक्षक", "आयुक्त", "सहआयुक्त", "अपर आयुक्त", "उप महानिरीक्षक", "उप आयुक्त", "सहायक आयुक्त", "अधीक्षक", "अपर अधीक्षक", "सहायक अधीक्षक", व "उप अधीक्षक", याचा अर्थ, या अधिनियमान्वये नेमलेला किंवा नेमण्यात आल्याचे मानण्यात आलेला अनुक्रमे पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस आयुक्त, पोलीस सह आयुक्त, पोलीस अपर आयुक्त, पोलीस उप महानिरीक्षक (कलम ८-अ अन्वये नेमलेला संचालक, पोलीस बिनतारी संदेश आणि पोलीस उप महानिरीक्षक, पोलीस मोटार परिवहन, यांसह) पोलीस उप आयुक्त, सहायक पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक (कलम ८-अ किंवा २२-अ अन्वये नेमलेल्या अधीक्षकासह), अपर पोलीस अधीक्षक, सहायक पोलीस अधीक्षक व पोलीस उप अधीक्षक असा आहे ;

(६अ) व (६ब)** ** ** **

(७) ते (१७) ** ** ** **

**३.** ते **२४.** ** ** ** **

**२५.** (१) ते (१-अ) ** ** ** ** महासंचालक व महानिरीक्षक, आयुक्त, उप महासंचालक (संचालक, पोलीस बिनतारी संदेश यासह) आणि अधीक्षक व प्रशिक्षण संस्थेचा प्राचार्य यांचे शिक्षा देण्याचे अधिकार.

(२) (अ) अपर महासंचालक, विशेष महानिरीक्षक यांसह महासंचालक व महानिरीक्षक, सहआयुक्त, अपर आयुक्त यांसह आयुक्त किंवा उप महानिरीक्षक यांना पोट-कलम (१) किंवा (१-अ) अन्वये निरीक्षकास किंवा दुय्यम दर्जाच्या कोणत्याही सदस्यांस, शिक्षा करण्याचा प्राधिकार असेल. अधीक्षकास, त्याला दुय्यम असणारा हाताखालचा जो कोणताही पोलीस अधिकारी निरीक्षकाच्या श्रेणीहून खालच्या श्रेणीचा असेल त्या पोलीस अधिकाऱ्याच्या बाबतीत तसाच प्राधिकार असेल आणि त्यास त्याच्या हाताखालील निरीक्षकास, त्याच्याविरूद्ध केलेल्या तक्रारीची चौकशी पूर्ण होईपर्यंत आणि पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक किंवा पोलीस अपर महासंचालक व अपर महानिरीक्षक, आणि संचालक, पोलीस बिनतारी संदेश व पोलीस उप महानिरीक्षक, अपर महानिरीक्षक यांचा आदेश मिळेपर्यंत, निलंबित करण्याचा अधिकार असेल.

(ब) ** ** ** **

(ब-अ) ** ** ** **

(क) ** ** ** **

(३) ** ** ** **

**२६.** ते **१६८.** ** ** ** **

**अनुसूची.** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६.]**

[ **महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.** ]

[**श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई